भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक- २१/५/२०१७

प्रेसनोट

**हॉटेल मालकावर प्राणघातक हल्ला करुन मुळचा हरियाणा राज्यात राहणारा आरोपीच्या "उत्तराखंड हरिव्दार" येथे जावुन आरोपीच्या मुसक्या आवळल्या भारती विदयापीठ पोलीस ठाण्याचे तपास पथकाची उल्लेखनीय कामगिरी**

आरोपी देवराज भुकदेव सिंग वय.२२ वर्ष रा. सहानपुर रोड अंबाला कॅन्ट हरियाणा हा सुमारे ६ महीन्यापासुन कात्रज कोंढवा रोडवरील शिवम हॉटेल येथे येथे वेटर म्हणुन कामास होता. हॉटेल मालक आनंद दत्तात्रय तांबे यांनी त्याचे पगाराचे पुर्ण पैसे दिले नाहीत म्हणुन रागाने जावुन आरोपी देवराज भुकदेव सिंग याने दिनांक २४/३/२०१७ रोजी रात्रौ १.३० वा चे नंतर हॉटेल मधील सर्व कामगार त्यांचे काम संपवुन खोलीत झोपण्यास गेलेनंतर हॉटेल मालक आनंद तांबे हे कॅश काऊंटरवर एकटेच असल्याचे पाहुन आरोपीने जाड बांबुनी अचानकपणे त्यांचे डोक्यावर चार ते पाच घाव घालुन प्राणघातक हल्ला करुन जखमी करुन ते बेशुध्द झाल्याचे पाहुन त्यांचे दोन मोबाईल हॅन्डसेट, एक चेक, बॅकेचे एटीएम कार्ड व रोख रक्कम ५०००/- रु घेवुन फरारी झालेला होता. सदरबाबत भारती विदयापीठ पोलीस ठाणे भादवि कलम ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. वरील आरोपी याचे १ महीन्यापासुन हरिव्दार राज्य उत्तराखंड येथे वास्तव्य असलेबाबत त्याचे मोबाईलचे टॉवर लोकेशन माहीती प्राप्त झालेनंतर मा.श्री विजयसिंह गायकवाड सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.उत्तम बुदगुडे, पो. कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर, गणेश सुतार, समीर बागसिराज, श्रीधर पाटील यांनी हरिव्दार उत्तराखंड येथे जावुन सदर ठिकाणी बातमीदार तयार करुन तसेच तांत्रिक विश्लेषक विभाग पुणे शहर चे पोलीस निरीक्षक श्री शकुर सय्यद सो यांचेकडुन आरोपीचे मोबाईलचे टॉवर लोकेशनची माहीती प्राप्त करुन घेवुन सलग १० दिवस शोध घेतला असता शेवटी आरोपी हा गुरुनानक हॉटेल हरिव्दार मध्ये वेटर म्हणुन काम करीत असल्याबाबत खात्रीशीर माहीती मिळाल्याने वरील अधिकारी व कर्मचारी यांनी गुरुनानक हॉटेल हरिव्दार येथे सापळा लावुन आरोपी देवराज भुकदेव सिंग वय.२२ वर्ष रा. सहानपुर रोड अंबाला कॅन्ट हरियाणा यांस ताब्यात घेवुन पुणे येथे आणुन त्यास दाखल गुन्हयात अटक केलेली असुन पुढील तपास सहा.पो.निरीक्षक सुर्यवंशी भारती विदयापीठ पोलीस ठाणे हे करीत आहेत.

**ही कारवाई मा.श्री डॉ प्रवीण मुंढे सो, पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विजयसिंह गायकवाड सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राजकुमार वाघचौरे सो पोलीस निरीक्षक (गुन्हे)भारती विदयापीठ पोलीस ठाणे, तसेच श्री शकुर सय्यद सो पोलीस निरीक्षक तांत्रिक विश्लेषक विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.उत्तम बुदगुडे, पो. कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर, गणेश सुतार, समीर बागसिराज, श्रीधर पाटील, बाबा नरळे यांचे पथकाने केलेली आहे.**